


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २८६, गुरुवार १ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# नगरला मेडिकल कॉलेज द्या

## ■ खा. नीलेश लंके यांचे केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांना साकडे ■ नड्डा यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद

नगर : प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील मोठया लोकसंख्येचा, मोठया क्षेत्रफळाचा जिल्हा असलेल्या नगर जिल्हयामध्ये शासकीय मेडीकल कॉलेज सुरू करून वैद्यकिय क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची सुविधा तसेच त्याअनुषंगाने आरोग्य सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून नगर जिल्हयात शासकिय मेडीकल कॉलेजला मान्यता देण्याचे साकडे खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांना मंगळवारी घातले. दरम्यान, मंत्री नडडा यांनी खा. लंके यांच्या मागणीस सकारात्मक प्रतिसाद देत नगर जिल्हयामध्ये हे महाविद्यालय लवकरात लवकर सुरू करण्याबाबत ग्वाही दिली.**



■ नगर जिल्हयात शासकीय मेडीकल कॉलेज सुरू करण्याच्या मागणीचे निवेदन खा. नीलेश लंके यांनी आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांना खा. सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत दिले.

संसदेतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या संसदरत्न खासदार सुप्रिया सुळे यांच्यासमवेत खा. लंके यांनी मंगळवारी मंत्री नड्डा यांची भेट घेउन नगर जिल्हयामध्ये शासकीय कॉलेजची अशी आवष्यकता आहे हे पटवून दिले. खा. सुळे यांनीही खा. लंके यांची मागणी रास्त असल्याचे सांगत लवकरात लवकर त्यांच्या मागणीस प्रतिसाद देण्याचा आग्रह धरला. त्यावर नड्डा यांनी लंके यांच्या मागणीचा लवकरच सकारात्मक विचार झालेला असेल असे खा. सुळे यांना आश्वस्त केले.

या मागणीसंदर्भात मंत्री नड्डा यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, केंद्रीय आरोग्य मंत्री या नात्याने नगर जिल्हयातील समस्या व त्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना याबाबत आपणास माहीती असेलच. नगर जिल्हयाचा विचार करता जिल्हयासाठी एका शासकीय मेडीकल कॉलेजची अत्यंत आवष्यकता आहे.

नगर जिल्हयातील बहुतांश विद्यार्थ्यांना वैद्यकिय शिक्षण घेण्यासाठी बाहेरच्या जिल्हयात जाण्याची वेळ येते. त्यामुळे केवळ आर्थिक बोजा पडत नाही तर पात्रता असलेले विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहत आहेत. शासकीय मेडीकल कॉलेजची निर्मीती झाल्यानंतर केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण मिळणार नाही तर जिल्हयात आरोग्य सेवांमध्ये चांगली सुधारणा होणार आहे.

लंके यांनी निवेदनात पुढे नमुद केले आहे की, नगर जिल्हयामध्ये आवष्यक ती जमीन तसेच पायाभुत सुविधा उपलब्ध आहेत. शिवाय जनतेमधून नगर जिल्हयामध्ये शासकीय कॉलेज असावे अशी सार्वत्रीक मागणी आहे. या सर्व बाबींचा विचार करून नगर जिल्हयात शासकीय मेडीकल कॉलेज सुरू करण्यासाठी आपण तातडीने पावले उचलावीत अशी विनंती खा. लंके यांनी मंत्री नड्डा यांच्याकडे केली आहे.

### लंके लागले कामाला !

**लोकसभा निवडणूकीत ऐतिहासिक विजय संपादन केल्यानंतर खा नीलेश लंके यांनी शिक्षक मतदारसंघाची आचारसंहिता संपताच कांदा व दुधाच्या दराबाबत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. पोलीस दलातील भ्रष्टाचाराविरोधात पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण केले. आता शासकीय मेडीकल कॉलेजच्या मागणीसाठी त्यांनी सुप्रिया सुळे यांच्यासोबत मंत्री नड्डा यांची भेट घेत आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे.**

# सिध्देश्वरवाडी, कोहकडी, शहाजापुर वनउद्यानांना तत्वतः मान्यता

## खा. नीलेश लंके यांची माहीती

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील सिध्देश्वरवाडी, कोहकडी तसेच शहाजापुर-सुपा येथील वन विभागाच्या हद्दीमध्ये वन उद्याने उभारण्यास वन विभागाच्या वतीने तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. एकूण १६ कोटी ४५ लाख ९९ हजार रूपयांच्या वन उद्यानांच्या कामांना तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.**



महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास महामंडळाच्या कार्यकारी समितीच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा कार्यकारी समितीचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे पार पडलेल्या बैठकीत महाराष्ट्रातील वन विभागाच्या हददीतील विविध प्रस्तावांना तत्वतः मान्यता देण्यात आली.

पारनेर तालुक्यातील कोहकडी, सिध्देश्वरवाडी, सुपा-शहाजापुर येथे वन उद्यान उभारण्यासंदर्भात खा. नीलेश लंके यांनी महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास मंजुरी मिळविण्यासाठी खा. लंके यांनी वेळेवेळी पाठपुरावा केला होता.

निसर्ग पर्यटन विकास महामंडळाच्या बैठकीत तीनही प्रस्तावांना तत्वतः मान्यता देण्यात आली. वन विभागाच्या अटींना अधीन राहून राज्य शासन किंवा जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त करण्याच्या अटींवर ही मान्यता देण्यात आली आहे. वनक्षेत्रात वन उद्यानांची निर्मिती केल्यास त्याचा फायदा नागरीकांना होणार असल्याने खा. लंके यांनी या प्रस्तावांना मान्यता मिळण्यासाठी पाठपुरावा केला होता.

सिध्देश्वरवाडी येथील सिध्देश्वर मंदिर परिसरात वन उद्यान उभारणीसाठी ३ कोटी ४० लाख ९० हजार, कोहकडी येथील रत्नेश्वर मंदिर फॉरेस्ट सर्व्हे क्र. ४९७ मध्ये वन उद्यानासाठी ३० कोटी ८ लाख ५५ हजार तर सुपा-शहाजापुर वन उद्यानासाठी ९ कोटी ९६ लाख ३१ लाख रूपयांच्या कामांना तत्वतः मान्यता देण्यात येत असल्याचे महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या सदस्य सचिव तथा व्यवस्थापकीय संचालकांनी खा. नीलेश लंके यांच्या कार्यालयास कळविले आहे.

# नाशिक, अहिल्यानगर, अमरावती, गडचिरोली जिल्ह्यात नवीन 'एमआयडीसी'

## अजित पवारांचे प्रस्ताव तयार करण्याचे आदेश

मुंबई : प्रतिनिधी

**राज्याच्या उत्पन्नवाढी बरोबरच रोजगार निर्मितीसाठी उद्योगांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. त्यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज, अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील लिंगदेव, अकोले, नाशिक जिल्ह्यातील कळवण-सुरगाणा, जांबुटके तसेच अमरावती जिल्ह्यातील वरुड येथे 'एमआयडीसी' उभारण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावेत. तसेच राज्यात यापुढे नवीन 'एमआयडीसी' उभारण्यासाठी किमान शंभर एकर जमिनीची उपलब्धता करून देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. पुणे जिल्ह्यातील डुंबरवाडी (ता. जुन्नर) येथे राज्यासह केंद्राच्या विविध योजनांच्या माध्यमातून फूड प्रोसेसिंग पार्क उभारण्यासाठी राज्य शासन सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले.**



'एमआयडीसी'ची आढावा बैठक वित्त व नियोजन मंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात आयोजित करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्याच्या विकासात उद्योगांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. राज्याच्या उत्पन्न वाढीसाठी तसेच रोजगार निर्मितीसाठी उद्योगांना चालना देण्याची सरकारची भूमिका आहे. राज्यातील प्रत्येक विभागांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज (वडसा), अहिल्यानगर जिल्ह्यातील लिंगदेव, अकोले, नाशिक जिल्ह्यातील कळवण-सुरगाणा एमआयडीसी बरोबरच जांबुटके (ता. दिंडोरी) येथील आदिवासी औद्योगिक समूह विकास योजना तसेच अमरावती जिल्ह्यातील वरुड येथे 'एमआयडीसी' उभारण्यासाठीचे सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करा. तसेच 'एमआयडीसी'च्या उभारणीसाठी किमान शंभर एकर जमिनीची उपलब्धता असणे आवश्यक आहे. किमान शंभर एकर जमीन उपलब्ध असेल तरच सर्वसोयींनीयुक्त 'एमआयडीसी' उभी राहू शकते. त्यामुळे यापुढे एमआयडीसी मंजूर करताना किमान शंभर एकर जमिनीची उपलब्धता असणे आवश्यक आहे.

पुणे जिल्ह्यातील उंबरवाडी (ता. जुन्नर) येथे केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून फूड प्रोसेसिंग उर्वरीत पान ३ वर

# "दोन ते तीन दिवस थांबा, मोठा पर्दाफाश करणार !"

## मनोज जरांगेंचे सूचक विधान

जालना : प्रतिनिधी

**गेल्या काही दिवसांपासून मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न चर्चेत आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केलेली आहे. यासाठी त्यांनी अनेकदा उपोषणही केले. मात्र, या मागणीबाबत राज्य सरकारने अद्याप कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर भूमिका स्पष्ट करण्याच्या मागणीसाठी काही मराठा आंदोलकांनी मंगळवारी उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' या निवासस्थानासमोर आंदोलन केले. यावर प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे यांनी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांवर हल्लाबोल केला. तसेच यावेळी त्यांनी सूचक विधानही केले. "दोन-तीन दिवस थांबा, मोठा पर्दाफाश करणार", असे मनोज जरांगे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे.**



**मनोज जरांगे काय म्हणाले?**

"मराठा आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करण्याची मागणी आम्ही केलेली आहेच. फक्त सत्ताधारी पक्षाला नाही तर विरोधकांना देखील आम्ही सांगतो. मराठा आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करा. सत्ताधारी आणि विरोधकांनी ७० वर्ष आमचे मते घेतलेले आहेत. त्यामुळे भूमिका स्पष्ट केली पाहिजे. जर हे भूमिका स्पष्ट करत नसतील तर यावेळी मराठा समाज त्यांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही", असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री या निवासस्थानाबाहेर मराठा आरक्षणावर भूमिका स्पष्ट करण्याच्या मागणीसाठी मंगळवारी काही आंदोलकांनी आंदोलन केले. यावर बोलताना मनोज जरांगे म्हणाले, "आता आम्ही टेन्शन घेत नाहीत. कारण लवकरच पर्दाफाश होणार आहे. कारण १२ ते १३ संघटनादेवेंद्र फडणवीसयांच्या सांगण्यावरून दरेकरांनी जमा केल्या आहेत. मराठा समाजाच्या बाजूने न बोलता फक्त काहीही बोलायचं असं त्यांनी सांगितले. आता आणखी दोन ते तीन दिवस थांबा, मग आणखी पर्दाफाश होईल. डोंबिवली, माहिम आणि मलबार हिलमध्ये आणि आणखी कुठे-कुठे बैठक झाली? या बैठकांना कोण-कोण होतं? कोण आमदार होते? हे माहिती आहे", असे मनोज जरांगे म्हणाले.

"आता आमचं आंदोलन सुरु नाही. आमची मागणी आहे की ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावं. मात्र, देवेंद्र फडणवीस यांना मराठेच मराठ्यांच्या अंगावर घालायचे आहेत. सध्या काय चित्र सुरु आहे हे क्लिअर होणार आहे. आरक्षणाच्या प्रश्नांबाबत सरकारने विरोधी पक्षांच्या दारात जावं किंवा विरोधी पक्षांनी सरकारकडे जावं. आरक्षणाबाबत भूमिका विचारण्यासाठी त्यांच्या दारात जाण्यासाठी आम्ही त्यांचे नोकर नाहीत. मराठा समाजामध्ये भांडण लावण्याचं काम सुरु आहे. मराठा समाजामध्ये जाब विचारण्याची ताकद आहे. पण मला माहिती आहे की देवेंद्र फडणवीस मला उघडं पाडण्यासाठी दरेकरांच्या माध्यमातून डाव रचत आहेत", असा आरोपही मनोज जरांगे यांनी केला.

# पूजा खेडकर यांची उमेदवारी रद्द

## भविष्यात कोणतीही परीक्षा देता येणार नाही

नवी दिल्ली :वृत्तसंस्था

**वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून मोठा दणका मिळाला आहे. यूपीएससीने पूजा खेडकर यांची उमेदवारी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच बरोबर पूजा खेडकर यांना भविष्यात सर्व परीक्षा देण्यास मनाई करण्यात आली आहे.**

महाराष्ट्र कॅडरच्या प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर या गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आहेत. चुकीचा माहिती आणि प्रमाणपत्राच्या आधारावर केंद्रीय लोकसेवा आयोगाची फसवणूक करून त्यांनी परीक्षा पास केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला होता. यासंदर्भात आयोगाने त्यांच्याविरुद्ध गुन्हा देखील दाखल केला होता. आता आयोगाने थेट कारवाई देखील केली आहे. यूपीएससीने पूजा खेडकर यांच्या २००९ ते २०२३ या काळातील सर्व रेकॉर्ड तपासल्यानंतर ही कारवाई केली आहे. खेडकर यांना नागरी सेवा परीक्षा नियम २०२२ नुसार दोषी ठरवण्यात आले आहे. पूजा खेडकर यांच्या प्रकरणामुळे यूपीएससी विचार करणार करणार आहे.



कालच पुणे पोलिसांनी पूजा खेडकर यांचा मोबाईल गेल्या ८ दिवसांपासून नॉट रिचेबल असल्याचे म्हटले होते. पुण्यात पूजा खेडकर यांनी केलेल्या प्रतापामुळे त्यांची वाशिमला बदली करण्यात आली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी त्यांच्याविरुद्ध पुणे पोलिसात तक्रार दाखल केली. या संदर्भात पुणे पोलिसांनी गुन्हा दाखल करत पूजा खेडकर यांना ३ वेळा समान्स काढला होता. मात्र तरी त्या पोलिसांसमोर हजर झाल्या नाहीत.

खेडकर कुटुंबातील फक्त पूजा खेडकर नाही तर त्यांची आई मनोरमा खेडकर आणि वडील दिलीप खेडकर हे देखील चर्चे आले आहेत. आई मनोरमा यांनी पिस्तूल दाखवून शेतकऱ्यांना धमकावल्या प्रकरणी त्यांना पोलिसांनी अटक केली आहे. सध्या त्या पोलिस कोठडीत आहेत. तर वडील दिलीप खेडकर यांनी बारामतीत नाव बदलून जमीन खरेदी केल्याचे प्रकरण समोर आले आहे. आता या प्रकरणी दिलीप खेडकर यांच्यावर देखील कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.








# फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

## असली स्टाईल नको रे बाबा...

**प्रत्येक मुलीचं स्वत:चं असं स्टाइल स्टेटमेंट ठरलेलं असतं. चारचौघांत वेगळं दिसण्यासाठी म्हणून तिचे प्रयत्न असतात. काहीवेळा मात्र तुमची हीच स्टाइल आरोग्याला घातक ठरू शकते. ती जीवावर बेतण्याआधीच योग्य ती काळजी घेतली पाहिजे.**

- मोठ्या बॅग्ज : नाकापेक्षा मोती जड! सध्या आकारानं मोठ्या असणाऱ्या बॅग्जची चलती आहे. ही बॅग हलकी असते, तोपर्यंत काही चिंता नाही; पण बॅगमध्ये जागा आहे या विचारानं मुली त्यात भारंभार सामान भरत जातात. नकळतपणे त्याचं ओझं एका खांद्यावर पडतं आणि तो दुखवायला सुरुवात होते. काही मुलींना तर बॅग खांद्याला अडकवून गाडी चालवण्याची सवय असते. त्यावेळी हाताची हालचाल मर्यादित होत असल्यानं ज्या खांद्यावर बॅग आहे, तो आखडला जातो. मानेचे स्नायूही दुखावतात. ते आखडणं ही मोठ्या दुखण्याची सुरुवात असू शकते हे लक्षात घ्या. त्यामुळे मोठी बॅग घेतली, तरी ती कॅरी करताना खांदा बदला. कधी ती नुसती हातात घेऊन चाला. गाडी चालवताना, तर ती खांद्यावर नकोच.
- किलर हिल्स : हिल्स म्हणजे प्रत्येक मुलीचा जीव की प्राणच. हिल्समुळे चालण्यात ग्रेस येत असली, तरी ते कायम वापरणं तोट्याचं आहे. हिल्स घातल्यानंतर पोश्चर ताठ राहातंच असं नाही. ते ठेवणं हीसुद्धा एकप्रकारची कला आहे. हिल्स घालून चालताना खांद्यात, पाठीत, कंबरेत आणि गुडघ्यात वाकायला होतं. यामुळे तिथले स्नायू दुखवण्याची शक्यता असते. तसंच, चालताना पाय वाकडा पडत असेल, तर तिथल्या टिश्यूंनाही हानी पोहोचते. त्यामुळे झेपतील आणि पोश्चर ताठ राहील अशाच हिल्सला प्राधान्य दिलेलं बरं. सतत हिल्स वापरून पायाच्या शिरा दुखावून कालांतरानं व्हेरिकोज व्हेन्सचा आजारही होऊ शकतो.
- टाइट जीन्सची फाइट! : बॉडी फिटिंग जीन्स तर मुली सर्रास वापरतात. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, यामुळे पायाची नस दबली जाऊ शकते. मांडीजवळची नस दबली जाण्याची शक्यता अधिक असते. तसंच, ज्यांना जास्त घाम येतो, त्यांनी अशा जीन्स घालता कामा नये. त्यामुळे फंगल किंवा स्वेटिंग इन्फेक्शन होण्याची भीती असते.
- पोनी टेल्स : जीन्स किंवा वेस्टर्न्सवर टाइट पोनी टेल चांगला दिसतो म्हणून तो सातत्यानं घालणं टाळा. यामुळे कपाळ मोठं होऊ शकतं, केसांची मुळं दुखावली जातात, डोकेदुखी सुरू होते, विशेषत: जिथं पोनी बांधला आहे, तिथल्या जागेला इजा पोहोचू शकते.
- अंतर्वस्त्रांची निवड : इनर गारमेंट्सची योग्य ती निवड आपल्यासाठी खूप महत्त्वाची आहे. ओढूनताणून डिझायनर, ट्रेंडी, कलर्ड ब्रा किंवा पँटी घालण्याच्या फॅशनमध्ये आपण आपलं नुकसान तर करून घेत नाही ना, ते पाहा. ब्रा कितीही स्टाइलिश असली, तरी योग्य त्या फिटिंगची नसेल किंवा कव्हे पूर्ण करणारी नसेल, तर स्तनाचे टिश्यू सैल पडू शकतात. तसंच, ती अती घट्टही नको. यामुळे टिश्यू ताणले जाण्याची शक्यता असते. काही संशोधनामध्ये तर घट्ट ब्रामुळे पाठीचं दुखणं आणि रक्ताभिसरणाला अडथळे निर्माण झाल्याची उदाहरणं समोर आली आहेत. इतर अंतर्वस्त्रांबाबतही हेच लागू होतं.

## स्टाईल जर्किन्सची!

**पावसाळा आला की निसर्ग, मुक्तविहार, रोमँटिक वातावरण या सगळ्याबरोबरच अत्यंत प्रॅक्टिकल विचार डोक्यात येतो, तो कपडे, ॲक्सेसरीजविषयीचा. म्हणजे पावसात हे सगळं नीट सांभाळायचं कसं, याचीच काळजी वाटायला लागते; पण पावसाळी कपड्यांतही अपडेट राहायचं असेल, तर जर्किन्सच्या काही नव्या स्टाइलविषयी माहिती घ्यायलाच हवी.**

- व्यक्तिमत्त्वाचा विचार : अनेकदा रेनकोट आणि जर्किनच्या पॅटर्नमध्ये फार वैविध्य पाहायला मिळत नाही. सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या ट्रेंडपैकी काही जर्किन्स आवर्जून आपल्याला हव्या त्या लूकची आणि आरामशीरपणा देणारी आहेत. जर्किन असलं, तरी त्याची फॅशन आपल्याला शोभेल, की नाही हा विचार केला जातोच. त्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा नेमका विचार करून जर्किनच्या बाबतीत आपल्याला अपडेट राहता येईल.
- चेक्स आणि बिनबाह्या : बिनबाह्यांची जर्किन्स फॉर्मल शर्टवर खुलून दिसतात. त्यांच्या आकार, रंग आणि पॅटर्नमध्येही सध्या बरंच वैविध्य पाहायला मिळतंय. प्लेनबरोबरच चेक्सची ही जर्किन फॅशन स्टेटमेंट म्हणून जीन्स, सिक्स पॉकेट्स किंवा हिप- हॉप पँट्सवर उत्तम दिसतात. आतल्या बाजूनं ही जर्किन्स मऊ कापडाची असल्यामुळे त्यातून ऊबही चांगली मिळते. यात काळा, निळा, पिवळा-हिरव्याची रंगसंगती असलेली जर्किन्स मस्त दिसतात.
- विरुद्ध रंगसंगती : बिनबाह्यांच्या किंवा पूर्ण बाह्यांच्या चेक्सच्या जर्किनमध्ये अनेकदा संपूर्ण जर्किनचा रंग आणि त्यांच्या खिशांचा रंग वेगळा असतो. ही परस्परविरोधी रंगसंगती उत्तम दिसते. काही कपडे हे कधीही घालता येणारे, पुन्हा पुन्हा वापरावेसे वाटणारे किंवा कपाटात हात घातल्यावर आपणहूनच आपल्याला खुणावणारे असतात. त्यातलाच एखादा आपला लाडका टी- शर्ट असेल, जो सद्य:स्थितीत खराब झाला आहे किंवा फार चांगल्या अवस्थेत नाही. अशा वेळी त्या टी-शर्टवर हे नवं कोरं जर्किन घालता येऊ शकतं. लाडका टी-शर्ट घालण्याची इच्छाही पूर्ण होते आणि विरोधी रंगसंगती असल्यामुळे ते खुलूनही दिसतं.



- स्पोर्टी लूक : संपूर्ण काळ्या रंगाचं जर्किन आणि त्याच्या बाह्या पांढऱ्या (विरुद्ध) रंगाच्या... अशी जर्किनही उत्तम स्पोर्टी लूक देतात. त्यात फिका केशरी, पिवळा, जांभळा, कॉफी कलर, गडद चॉकलेटी, हिरवा, निळा, आकाशी, करडा असे रंगही सुंदर दिसतात. बऱ्याचदा हूड असलेल्या जर्किनला तरुणांकडून पसंती दिली जाते. ऑफिस किंवा कॉलेजच्या रोजच्या वापरासाठी पट्टे असलेली जर्किनही तरुणांमध्ये लोकप्रिय आहेत.
- पोलो नेक : पोलो नेक जर्किनही त्यांच्या वेगळ्या पॅटर्नमुळे तरुणांच्या पसंतीची ठरतात. झिप गळ्यापर्यंत असल्यामुळे यातून पाणी आत शिरण्याचाही प्रश्न येत नाही. पाऊस नसेल, त्या दिवशी ही झिप फक्त गळ्यापर्यंतच लावून ओपन कॉलर म्हणूनही याचा उत्तम उपयोग होऊ शकतो.

## मान्सून... खरेदीचा मोसम!

**पावसाची खरेदी करून झाली असेल, तर किरकोळ शॉपिंगसाठी तयार व्हा. बाजारात कानातले, गळ्यातले, हेअर क्लिप, हेअरबँड, इमिटेट ज्वेलरी यामध्ये तुफान चलती आहे. सध्या पावसाच्या खरेदीचा जोर आहे. रेनकोट, छत्र्या, बॅग, चप्पल, शूज अशा खरेदीसाठी लोक कोरोनाच्या सावटातही दिसत असले तरी या व्यतिरिक्तही वस्तू खरेदीकडे कल आहे. तसं म्हटलं तर कपडे, बॅग, शूज, चप्पला यामध्ये फारसं नावीन्य नाही; पण विंडो शॉपिंगसाठी बराच वाव आहे. कानातले, गळ्यातले, क्लिप, हेअरबँड, इमिटेट ज्वेलरी अशा ॲक्सेसरीजमध्ये तुफान नावीन्य दिसून येतंय. यामध्ये डिझाइन आणि रंगांमध्ये व्हरायटी असल्यानं खरेदीला खूप वाव आहे. मोठ्या पर्स नाही; पण हँडबॅगची खरेदीही नक्कीच आनंद देणारी ठरेल. नटण्या-मुरडण्यासाठी सध्या कोणता सण किंवा मुहूर्त नाही खरा. तरीही व्हरायटीचं कलेक्शन करायला हरकत नाही.**



- मेरा कमरपट्टा! : छल्ल्याच्या डिझाइनमध्ये मोडणारा कमरपट्ट्याचा प्रकार तरुणींमध्ये इन आहे. बाजूला कुंदन आणि स्टोनचं वर्क असलेले दोन छल्ले आणि त्यांना जोडणारी मोत्याची सुरेख माळ असं त्याचं स्वरूप आहे. सोन्याचे कमरपट्टे किंवा छल्ले हे वर्कच्या आणि डिझायनर साड्यांवर चालत नाही; पण या आधुनिक प्रकारानं ती कमतरता दूर केली आहे.
- हँडबॅग माझी खास : स्टाइलिश हँडबॅग घेण्याच्या विचारात असाल, तर हीच योग्य वेळ आहे. म ल्टिकलर्ड क्लच किंवा क्रॉस बॅगची खरेदी तुमची शोधाशोध नक्कीच संपवेल. आता पाऊस आहे म्हटल्यावर अशा बॅग बाहेर काढता येत नाहीत. मात्र, त्याची तरतूदही बाजारात आहे! रबर प्लास्टिक प्रकारामध्ये क्रॉस बॅग आणि मोबाइल पाउच उपलब्ध आहेत. हा प्रकार सगळ्यांत खास म्हणावा असा आहे.
- आराध्या बेल्ट! : ऐश्वर्या रॉय- बच्चननं मुलगी आराध्याला केसांना डिझायनर बेल्ट लावणं सुरू केल्यानंतर बाजारात असेच बेल्ट ढिगानं आले. हा ट्रेंड अद्याप टिकून आहे. सिंगल बेल्ट आणि त्यावर विविधरंगी मोठं फुल असं त्याचं स्वरूप. आराध्याचं हे स्टाइल स्टेंटमेंट रस्त्यावरही लगेचच उतरलंय! सगळ्या आयांच्या नजरा त्याच्याकडेच खेचल्या गेल्यात.
- स्टाइलिश हेअरपिन्स : केस न विंचरता कसेही बांधण्याची किंवा मोकळे सोडण्याची फॅशन कॉलेज तरुणींमध्ये आहे. हे केस आवरण्यासाठी म्हणून मोठ्या पिना वापरता येतील. विविधरंगी हेअरपिन्सची चलती असल्यानं रखरखीत केसही स्टाइलिश दिसतील!
- टाकाऊपासून टिकाऊ! : लाकडी कानातल्यांचं डिझाइन तरुणींचं लक्ष वेधून घेतंय. विविध भौमितिक आकारांमध्ये याचे सेट उपलब्ध आहेत. जीन्स किंवा स्कर्टवर


### कान में झुमका...

सध्या मोठ्या कानातल्यांची फॅशन आहे. डिझायनर साडीवर नुसते हे कानातले घातले, की बातच होऊन जाते. आधी काही डिझायनर शो-रूममध्येच असे कानातले मिळायचे. आता यामध्ये बरीच व्हरायटी रस्त्यावरच्या दुकानांमध्ये आली आहे. आधुनिक आणि पारंपरिक प्रकार यामध्ये पाहायला मिळतात. झेडएक्स या सिंगल स्टोनचा आधुनिक प्रकार खूपच खास आहे. यात कानातले आणि गळ्यातल्याचा सेट मिळून जाईल. गळ्यातलं नको असेल, तर नुसता कान पॅटर्न घेऊ शकता. यामध्ये अख्खा कान कव्हर करणारं डिझाइन आहे. कुंदन, मोती आणि क्रिस्टल बॉलमध्ये हा प्रकार उपलब्ध आहे. पारंपरिक झुमके नको असतील तर मेटलमध्ये मोठ्या कानांतल्यांची बरीच व्हरायची पाहायला मिळतेय. कानाच्या पाळीला लहान गोल आणि त्याखाली मोठा गोल अशाप्रकारचं त्याचं डिझाइन आहे.

ट्रेंडी गळ्यातल्याच्या शोधात असाल, तर हेच खरेदी करा. लांबीनं मोठं असल्यानं ते पाश्चात्य पेहरावावर शोभून दिसतं. मेटलमध्ये लांबीनं मोठे गळ्यातले मिळून जातील. मात्र, त्यासाठी जास्त पैसे मोजण्याची तयारी हवी.



## फॅशन मधल्या भांगाची!



बी-टाऊनमध्ये एखादी फॅशन यायची देर की कॉलेजच्या मुलींनी ती आपलीशी केलीच म्हणून समजा. सध्या फॅशन आहे, ती मिडल पार्टीशन म्हणजे, केसांत मधोमध भांग पाडण्याची. मधोमध भांग पाडून घट्ट वेणी घालणं ही आपली पारंपरिक फॅशन. म्हणूनच की काय आत्ताआत्तापर्यंत मुली त्याला नाकं मुरडताना दिसायच्या. फॅशनेबल दिसायचं म्हणजे, मधल्या भांगाऐवजी डाव्या किंवा उजव्या बाजूला भांग पाडलाच पाहिजे असा एक फंडा होता. पण सध्या मात्र तो बदलताना दिसतोय. अनुष्का शर्मा, आदिती राव-हैदरी, सोनम कपूर यांचा रेड कार्पेट लुक पाहिला तर मधल्या भांगाची फॅशन अगदी ठळकपणे दिसून येईल. सध्या कॉलेजच्या लेडिज रुममध्ये बऱ्याचजणी आरशात पाहून आपला हा मधला भांग पाडण्यात मग्न असतील तर नवल वाटायला नको!

## नातं दिराशी...

**दिरासोबतचं एक नातं जपताना थोडीशी चूक किंवा निष्काळजीपणा केल्यास एक नाही तर अनेक नाती खराब होतात. त्यामुळे दिरासोबत नातं कसं ठेवावं, याबाबत प्रत्येक विवाहितेने काही गोष्टींचा विचार करायला हवा.**

वहिनी आणि दिराच्या नात्यात काही मर्यादा आवश्यक असतात. दिरासोबत बोलताना काही गोष्टींचे भान हवे. यामुळे नात्यात एकमेकांविषयी आपोआप आदर येतो. यामुळे नात्यात अशी कोणती घटना किंवा प्रसंग घडत नाही. ज्यामुळे आयुष्यात दोघांनाही तणावातून जावं लागेल. नातं कितीही मैत्रीपूर्ण असो पण याचा अर्थ असा मुळीच नसतो की दोघांना एक मेकांच्या वैयक्तिक आयुष्यात हस्तक्षेप करण्याचे अधिकार मिळालेत. समोरची व्यक्ती आपला सल्ला मागत नाही तोपर्यंत आपण स्वत:हून हस्तक्षेप करणं चुकीचं असतं. तुमच्या वैवाहीक आयुष्यातही दिराला सामील करू नका. कारण यामुळे गैरसमज वाढू शकतात. कारण अनेक महिला नवरा आपल्यासोबत काही वाईट वागला की दिराला सांगून नवऱ्याला समजावून सांगण्याची गळ घालतात. हे पूर्ण चुकीचे आहे. यामुळे आपलेच नाते खराब होते, हे त्यांच्या लक्षात येत नाही. नवरा आणि दिराच्या संभाषणातही यायला नको. दोघांच्या भांडणांमध्येही पडू नका. बऱ्याचदा मैत्रीत गुपितं असतात पण वहिनी आणि दिराच्या नात्यात गुपितं ठेवणं भारी पडू शकतं. दिराने कोणते गुपित नवऱ्यापासून लपवण्यास सांगितले तर असं मुळीच करू नका. हे लपवा-छपवी करण्यापासून दिराला सरळ नकार द्या. दिराशी संबंधित कोणतीच गोष्ट निदान नवऱ्यापासून तरी लपवू नका. दिर तुमच्याकडे पैसे मागतो आहे तर अशावेळी व्यावहारीक दृष्टीकोन बाळगा. एकदा तुम्ही पैसे दिल्यास तो सतत तुमच्याकडे येऊ शकतो आणि दरवेळी नवऱ्यापासून लपवून पैसे देणं तुम्हाला महागात पडू शकतं.



## मास्कमुळे सौंदर्याला बाधा... ही घ्या काळजी

मास्कच्या वापरामुळे अनेक जणींना चेहऱ्यावर मुरुम, बारीक पुरळ आणि रॅशेजचा त्रास होत असल्याचे दिसून येत आहे. मास्क घट्ट बांधल्यानं श्वास घेतानाही अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे मास्क वापरताना कळत नकळत चुका करू नका. तुमच्याच चुकांमुळे चेहऱ्याचं नुकसान होऊ शकतं. घाम, चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल(तेलकट त्वचा), धूळ, मातीचे कण चेहऱ्यावर लावलेल्या मास्कवर जमा होतात. वातावरणातील दुर्गंधीचा चेहऱ्यावर वाईट परिणाम होतो. यामुळे त्वचेवर मुरुम, बारीक पुरळ, त्वचेला खाज सुटणे, त्वचा लाल होणे, मुरुमांचे डाग आदी समस्या उद्‌भवतात. सोबतच रक्त वाहिन्यांवरही यामुळे वाईट परिणाम होऊ लागतो. या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी आपल्या त्वचेची नियमित देखभाल करणं आवश्यक आहे. तुम्ही चेहऱ्यासाठी वापरत असलेले मास्क स्वच्छ आहे की नाही? याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

### मेकअप नकोच

**कित्येक महिलांना विनाकारण मेक अप करण्याची सवय असते. पण मास्क लावलेले असताना चेहऱ्यावर मेक अप करणं टाळा. चेहऱ्यावर मेक अप लावल्यानं त्वचेला पुरेशा प्रमाणात ऑक्सिजनचा पुरवठा होत नाही. यामुळे रक्ताभिसरण प्रक्रियेवरही परिणाम होतो. यामुळे त्वचेवरील छिद्रांमध्ये दुर्गंध जमा होऊ लागते. छिद्रांमधील घाण स्वच्छ न झाल्यास मुरुम, त्वचेचे विकार होण्याची शक्यता आहे. वेळीच याकडे लक्ष न दिल्यास त्वचा विकार गंभीर होऊ शकतात.**

## पावसाळ्यात सांभाळा शोभेच्या वस्तू

**घरात वेगळ्या शोभेच्या वस्तू ठेवण्यासाठी आपण अँटिक वस्तू घेतो. मात्र, त्यांची काळजी घेणं महत्त्वाचं असतं. पावसाळ्यात त्यांची काळजी घेण्यासाठी काही टिप्स...**



सहा महिन्यांतून एकदा पेंटिंगचा कॅनव्हास आणि फ्रेम तपासून पाहावी. फ्रेम बदलता येत असेल तर आवर्जून बदला. सुक्या आणि मऊसर कपड्यानं चित्राची फ्रेम रोज स्वच्छ करा. अँटिक वस्तू फक्त मऊसर कोरड्या कपड्यानंच साफ करा. अथवा मऊ धाग्यांचा टूथ ब्रश वापरा. सूर्याची किरणं जिथं पडतील, आग किंवा हिटरच्या ठिकाणी चित्रं आणि इतर अँटिक वस्तू ठेऊ नका. एखादी वस्तू ती पॅक करून ठेवताना विशेष काळजी घ्या. कापूस, बँडेज किंवा एखादा मऊसर कपड्यात ती आधी बांधून घ्या. मग त्यावर पेपर लावा. त्या आकाराचा बॉक्स मिळाला तर त्यात ठेवा. अन्यथा, प्लास्टिक किंवा कॉटनच्या पिशवीची व्यवस्था करा. यामुळे तिची चकाकी टिकून राहते. बांधून ठेवली, तरी सहा महिन्यांतून एकदा त्या वस्तूची तपासणी करा.

## शॉर्ट न्यूज

### पोलीस ठाण्यासमोरील उपोषण मागे

■ **सोनई :** येथील संदीप कुसळकर यांनी गुन्हा दाखल करण्यासाठी सोनई पोलीस ठाण्यासमोर ४ दिवसांपासून सुरू केलेले उपोषण पोलीस अधिकारी आशिष शेळके यांच्या मध्यस्थीने सोडले आहे. एलसीबीचे कर्मचारी असल्याचे सांगत फसवणुकीचा गुन्हा दाखल करणार असून हे प्रकरण मिटवण्यासाठी खंडणी मागितली असा आरोप करून गुन्हा दाखल करण्यासाठी सोनई पोलीस ठाण्यासमोर कुसळकर यांनी उपोषणास सुरुवात केली होती. या उपोषणास पाठिंबा म्हणून व्यापारी संघटनेने दुपारपर्यंत सोनई बंद ठेवण्याचा निर्णय घेतला व उपोषण स्थळी ग्रामस्थांनी भेट देऊन पाठिंबा दिला.

### अमोल मिटकरींच्या प्रतिमेला मारले जोडे

■ **नगर :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्ष प्रमुख राज ठाकरे यांच्याविरोधात केलेल्या वक्तव्याचा निषेध महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून राज्यभर होत आहे. नगर शहरातही मनसेतर्फे अमोल मिटकरी यांचा तीव्र निषेध करण्यात आला. दिल्ली गेट येथे अमोल मिटकरी यांच्या प्रतिमेस मनसेतर्फे काळे फासण्यात आले व जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

### पत्रकारांचे प्रश्न सोडविले जातात

■ **श्रीगोंदा :** पत्रकार हा सर्व समाजाचे प्रश्न, अडचणी सोडविण्याचे काम करतो. परंतु पत्रकारांच्या अडचणी कोण सोडविणार, म्हणूनच राज्यातील पत्रकारांचे प्रश्न महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने मार्गी लावत असल्याचे प्रतिपादन प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांनी केले. श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील सहकारमहर्षी सेवा संस्थेच्या सहकार सभागृहात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या जिल्हास्तरीय पत्रकार स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी जोशी बोलत होते.

### अजित पवारच मुख्यमंत्री होणार

■ **कोपरगाव :** राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येणार व अजित पवार मुख्यमंत्री होणार असल्याचा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी कोपरगाव येथे व्यक्त केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जन सन्मान रॅलीच्या नियोजनासंदर्भात कोपरगाव मतदारसंघाचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यकर्त्यांचा मेळावा कोपरगाव येथे खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत व आमदार आशुतोष काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

### पाथर्डीत मोफत गणवेश योजनेचा बोजवारा

■ **पाथर्डी :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गणवेश वाटपाचा गोंधळ झाल्याने शिक्षकांना व पालकांना मनस्तापाला सामोरे जाण्याची वेळ आली आहे. जेवढा पट तेवढे गणवेश आले नाही. जेवढे गणवेश आले तेही विद्यार्थ्यांच्या मापाचे नसल्याने व बदलून सुद्धा मिळत नसल्याने पुढे काय? असा प्रश्न उभा ठाकला आहे. राज्य शासनाने जिल्हा परिषद संचालित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्याची योजना सुरू केली. पूर्वी गणवेशा संदर्भातील अधिकार हे शालेय व्यवस्थापन समितीला होते. हे अधिकार समितीकडे असताना गोंधळ उडत नव्हता.

# डॉ.विखे पाटील जीवन गौरव पुरस्कार डॉ.प्रेमानंद गज्वी यांना जाहीर

## डॉ.चव्हाण, शिलेदार, डॉ.हेमाडे देशमुख, शेख यांनाही विविध पुरस्कार । पुरस्कार निवड समितीची घोषणा



**लोणी : प्रतिनिधी**

**सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंती दिनानिमित्ताने दरवर्षी देण्यात येणाऱ्या साहित्य जीवन गौरव आणि कलागौरव पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, या वर्षीची पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील साहित्य जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रेमानंद गज्वी, राज्यस्तरीय उत्कृष्ठ साहित्य पुरस्कार डॉ.समीर चव्हाण, राज्यस्तरीय विशेष साहित्य पुरस्कार प्रफुल्ल शिलेदार, अहमदनगर जिल्हा साहित्य पुरस्कार डॉ.श्रीनिवास हेमाडे, डॉ. विखे पाटील राज्यस्तरीय नाट्यसेवा पुरस्कार प्राजक्त देशमुख आणि राज्यस्तरीय कलागौरव पुरस्कार तमाशा कलावंत हसन शेख पाटेवाडीकर यांना देण्यात येणार असल्याची माहीती पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ.रावसाहेब कसबे यांनी दिली.**

पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंती दिनाच्या निमित्ताने दरवर्षी या साहित्य आणि कलागौरव पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. यंदाचे हे ३४ वर्ष असून, डॉ.विखे पाटील यांच्या १२४ व्या जयंती दिना निमित्ताने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रविंद्र शोभणे यांच्या हस्ते नारळी पोर्णीमेच्या दिवशी महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुरस्कारांचे वितरण होणार असल्याचे पुरस्कार निवड समितीचे निमंत्रक डॉ.राजेंद्र सलालकर यांनी सांगितले.

डॉ.प्रेमानंद गज्वी (मुंबई) हे मराठी नाटककार, कवी, विचारवंत म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून जीवनभर त्यांनी लेखन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव हा त्यांच्या लेखणीतून कायम दिसून आला. त्यांच्या प्रत्येक नाटकात समाजातील एखाद्या समस्येवर प्रखर प्रकाश झोत टाकलेलाच दिसतो. वंचित, पिडीतांचा दबलेला आवाज मुखर करण्यासाठी जीवनभर प्रतस्तपणे काम करणाऱ्या साहित्य निष्ठेचा गौरव यंदाचा पद्मश्री डॉ.विखे पाटील साहित्य जीवन गौरव पुरस्कार देवून करण्यात येणार असून, स्मृतीचिन्ह, १ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप असल्याचे डॉ.कसबे म्हणाले.

डॉ.विखे पाटील राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ठ साहित्य पुरस्काराने गौरविण्यात आलेले डॉ.समीच चव्हाण (कानपुर) आय.आय.टीमध्ये गणिताचे प्राध्यापक असून, साहित्य हा त्यांच्या आवडीचा प्रांत आहे. संत तुकारामांच्या जीवनाचे विश्वदर्शन घडविण्यासाठी ‘अखई ते जाले’ हा ग्रंथ त्यांनी शब्दबध्द केला. या माध्यमातून संत तुकारामांना अधिक उंचीवर नेण्याचा केलेला यशस्वी प्रयत्नांची दखल पुरस्कार निवड समितीने घेतली असून, रुपये ५१ हजार आणि स्मृतीचिन्ह अशा विशेष साहित्य पुरस्काराने त्यांचा सन्मान केला जाणार आहे.

प्रफ्फुल शिलेदार (नागपुर) यांच्या ‘हरविलेल्या वस्तुंचे मिथक’ या कविता संग्राहास डॉ.विखे पाटील अहमदनगर जिल्हा साहित्य पुरस्कार जाहिर झाला असून, स्मृतीचिन्ह आणि २५ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. प्रफ्फुल शिलेदार यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून मुंबई शहराचे रुपक घेवून मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा आलेख मांडण्याचा प्रयत्न आपल्या कवितांमधून केला आहे. त्यांची कविता मुशाफिरी व मानवी मनाला चिंतनशिल करणारी आहे. या कवितांचे वेगळेपण विचारात घेवून त्यांचा सन्मान करण्याचा निर्णय पुरस्कार निवड समितीने घेतला आहे.

पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अहमदनगर जिल्हा साहित्य पुरस्कार प्रा.डॉ.श्रीनिवास हेमाडे (संगमनेर) यांना घोषित झाला असून, ‘पेचामध्ये अडकलेल्या अडीच हजार वर्षातील तत्वज्ञानाचा प्रवास’ डॉ.हेमाडे यांनी अत्यंत सुलभ भाषेत लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. तत्वज्ञान हे जीवनाचे स्पष्टीकरण करणारे आणि त्याला दिशा देणारे शास्त्र आहे. त्याचा प्रभाव वर्तमान व सांस्कृतीक प्रवाहात टाळता येत नाही यासाठी त्यांनी शब्दबध्द केलेला तत्वभान ग्रंथ हा निश्चित उपयोगी पडेल असे समितीला वाटत त्यामुळेच त्यांचा सन्मान समितीने स्मृतीचिन्ह आणि १० हजार रुपये देवून करण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्ह्यातील नेवासा येथील प्रा.बाळासाहेब लबडे (नेवासा) यांचे ‘काळ मेकर लाइव्ह’ या कांदबरीला अहमदनगर जिल्हा विशेष साहित्य पुरस्कार देण्यात येणार असून, स्मृतीचिन्ह आणि २५ हजार रुपये देवून करण्यात येणार आहे. समाज माध्यमांव्दारे माहितीचा महापुर आल्यानंतर जे जीवनाचे भेसूर आणि अराजकीय वास्तव निर्माण झाले आहे. त्याचे नव्या तंत्रशैलित चिंत्रण करणारी ही कांदबरी असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

नाट्यलेख आणि दिगदर्शक प्राजक्त देशमुख (नाशिक) यांच्या ‘संगीत देवभाबळी’ या नाटकामुळे संगीत नाटकाला पुन्हा उर्जितावस्था मिळाली. एक अभिनेता म्हणूनही त्यांनी नाट्यक्षेत्रात आपले एक वेगळे वलय निर्माण केले. नव्या दमाचा, नव्या पिढीचा हा नाटककार मराठी नाट्य परंपरेला निश्चित पुढे नेईल असा विश्वास पुरस्कार निवड समितीला असल्यामुळे राज्यस्तरीय नाट्यगौरव पुरस्कार देवून त्यांचा सन्मान देवून स्मृतीचिन्ह आणि २५ हजार रुपये देवून सन्मानित करण्यात येणार आहे.

अहमदनगर जिल्ह्याचे सुपूत्र असलेले हसन शेख पोटेवाडीकर (कर्जत) यांना यंदाचा डॉ.विखे पाटील राज्यस्तरीय कलागौरव पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार असून, नाट्य कलावंत कांताबाई सातारकर, रघुवीर खेडकर यांच्या समवेत त्यांनी तमाशा मंडळात काम केले. वगनाट्या मध्ये स्वतंत्र महत्वाच्या भूमिका करुन त्यांनी तमाशा कलेमध्ये आपले वेगळेपण सिध्द केले आणि स्वत:चाच तमाशा फड सुरु केला. महाराष्ट्राची लोकधारा व लोकपरंपरा जपतानाच ग्रामीण महाराष्ट्राचे मनोरंजन व समाज प्रबोधन करण्याच्या कार्याची दखल घेवून पुरस्कार निवड समितीने यंदाचा राज्यस्तरीय कला गौरव पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय निवड समितीने घेतला असून, त्यांना स्मृतीचिन्ह आणि २५ हजार रुपये देवून सन्मानित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

या पुरस्कार निवड समितीमध्ये डॉ.रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.एकनाथ पगार, डॉ. दिलीप धोंडगे व डॉ.राजेंद्र सलालकर यांचा समावेश होता.

(पान १ वरून)

### नाशिक, अहिल्यानगर, अमरावती, गडचिरोली जिल्ह्यात नवीन ‘एमआयडीसी’

पार्क उभारण्यासाठी राज्य सरकार सकारात्मक आहे. या ठिकाणी फूड प्रोसेसिंग पार्क उभारण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक आमदारांच्या सोबत जागेची पहाणी करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. त्याचबरोबर बारामती एमआयडीसी मधील प्रलंबित कामे, चाकण एमआयडीसीतील शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयीही चर्चा करण्यात आली.

या बैठकीला उद्योग मंत्री उदय सामंत, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम, आमदार किरण लहामटे, आमदार देवेंद्र भुयार, आमदार दिलीप मोहिते-पाटील, आमदार अतुल बेनके (व्हिसीद्वारे), आमदार नितीन पवार (व्हिसीद्वारे), नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपिन शर्मा यांच्यासह संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त व्हिसीद्वारे उपस्थित होते.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2

डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

## वाचकांच्या लेखणीतून

### शोधक बुध्दीला सलाम!

युवा सेनेचे तालुकाप्रमुख व शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे तसेच अन्य पदाधिकाऱ्यांतर्फे निघोज येथील कुंडस्थळमार्गे पुणे अशी बससेवा सुरू करावी. निघोज ते कुंड पर्यटनस्थळ हा खस्ताहाल रस्ता दुरुस्त व्हावा. असे निवेदन पारनेर एस.टी. स्थानक आगारप्रमुख, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, पारनेर, आणि आपले विद्यमान खासदार निलेश लंके यांना दिले असल्याचे कळते. संबंधित सरकारी विभाग आणि लोकनेते खा. निलेश लंके हे या गाऱ्हाण्याची तड लावण्याचा निश्चितच प्रयत्न करतील अशी आशा आहे.



निघोज ते कुंड पर्यटनस्थळ रस्ता दुरुस्त झाल्यास आसपासच्या भाविक, व्यापारी आणि गरजू लोकांना निघोज कुंड पर्यटनस्थळमार्गे पुण्यापर्यंतचा प्रवास सोयीचा आणि सुखावह होणार आहे. शिवाय निघोज ही या भागातील मोठी बाजारपेठ आणि येथील कुंडस्थळ हे पर्यटनक्षेत्रही आहे. या गोष्टी यात विचारात घेतल्या आहेत. या निवेदनात नवता आणि प्रतिभाही आहे हे विशेष. शमीम जयपुरी म्हणतात त्याप्रमाणे ज़मीं पे रह के दिमाग़ आसमां से मिलता है! म्हणून अनिल शेटे आणि अन्य पदाधिकाऱ्यांच्या शोधक बुद्धीला सलाम केला पाहिजे.

अनिल शेटे आणि अन्य पदाधिकाऱ्यांच्या सदर मागणीला अंमलबजावणीचे विधायक रूप मिळेल अशी आशा करूया.

■ नाना ढवळे
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# पत्नीचा खून करणाऱ्या पतीला जन्मठेप

## जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल



**नगर : प्रतिनिधी**

**रागाच्या भरात पत्नीचा खून करणाऱ्या आरोपीला जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. वसंत लक्ष्मण शिंदे (वय ५२, रा. गुंजाळे, ता. राहुरी) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. या खटल्यात सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील अनिल घोडके यांनी काम पाहिले.**

वसंत शिंदे हा त्याच्या पत्नीसह एका कोपीमध्ये राहत होता. त्याच्या कोपीपासून काही अंतरावर त्याची मुलगी बाली निकम राहते. वसंतची पत्नी अलकाबाई एकदा बालीजवळ आली. तिने वसंत व तिच्यातील भांडणाविषयी तसेच वसंत दारू पिऊन मारहाण करत असल्याने मुलाकडे रहायला जायचे असल्याचे बालीला सांगितले. तीन दिवसांनी म्हणजे १८ ऑगस्ट २०२१ रोजी अलकाबाई व वसंत शिंदे यांच्यात भांडण झाले. भांडणात वसंतने केलेल्या मारहाणीत अलकाबाई गंभीर जखमी होऊन खाली पडल्या. त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यामुळे भेदरलेल्या वसंत शिंदेने ही बाब मुलगी बालीला सांगितली. बाली धावत आईजवळ गेली. मात्र, आई अलकाबाई हलचाल करत नसल्याने तिने हंबरडा फोडला. तिचा आवाज ऐकून लोक जमा झाले. त्यांनी पोलिसांना बोलावले. पोलीस आल्यावर अलकाबाईचा मृत्यू झाल्याचे बालीला कळले.

या प्रकरणी बालीने वडील वसंत शिंदे विरोधात राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी पुरावे व दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले. जिल्हा व सत्र न्यायालयाने आठ साक्षीदार तपासले. यात फिर्यादी बाली निकम, पंच साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी आदींचा समावेश होता. आरोपीकडून हस्तगत केलेले रक्ताने भरलेले कपडे पोलिसांनी न्यायालयात सादर केले. उपलब्ध पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत जन्मठेप व पाच हजार रुपये दंडाची तसेच दंड न भरल्यास एक महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली.

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच

मेजर भगवान नांगरे सर
✻ आमची वैशिष्ट्ये ✻
✻ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✻ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✻ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✻ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✻ अत्याधुनिक व सुसज्ज अशी अभ्यासिका
✻ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
✻ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# पळशी सोसायटीला मिळणार अद्यावत इमारत

## ज्ञानदेव लंके यांच्या हस्ते भुमिपुजन

पळशी : प्रतिनिधी

**पळशी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीला लवकरच अद्यावत इमारत मिळणार असून मंगळवारी या इमारतीच्या कामाचे खा. नीलेश लंके यांचे वडील ज्ञानदेव लंके यांच्या हस्ते भुमिपुजन करण्यात आले.**

यावेळी बोलताना ज्ञानदेव लंके म्हणाले, अनेक सेवा संस्थांना स्वतःच्या इमारती नसल्याने कामकाज करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असे. अशा संस्थांना इमारतीसाठी निधी देण्याचा शब्द खा. लंके यांनी दिला होता. त्यानुसार पळशी सोसायटीच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून लवकरच ही इमारत उभी राहून संस्थेचे कामकाज अधिक परिणामकरित्या होईल असा विश्वास लंके यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी पळशीचे लोकनियुक्त सरपंच प्रकाश राठोड, सेवा संस्थेचे चेअरमन राजेंद्र बिलबिले, व्हा. चेअरमन चंद्रकला गागरे, मा. सरपंच गणेश मधे, मा. उपसरपंच अप्पासाहेब शिंदे, उपसरपंच नवनाथ आगविले, ग्रामपंचायत सदस्य संकलेश मोढवे, मा. चेअरमन अंबरनाथ वाळुंज, सोसायटीचे संचालक भाऊ सरोदे, उमाहरी मोढवे, बाबासाहेब शिंदे, रविंद्र खटाटे, नाना लव्हाटे, गंगाराम बरकडे, तुळशीराम मेंगाळ, नंदू साळवे, विकास गांधी, हनुमान वाढवणे, रविंद्र शिंदे, सुभाष जाधव, नामदेव जाधव, सुरेश घुवे, अमोल गागरे, सोसायटीचे सचिव दिगंबर सुडके, ठेकेदार शेळके, सुभाष ढेकळे, बबनराव ढोकळे यांच्यासह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.



पळशी सोसायटीच्या इमारतीचे भुमिपुजन करण्यात येउन वंचित लाभार्थ्यांना ज्ञानदेव लंके यांच्या हस्ते रेशन कार्डचे वितरण करण्यात आले.

### रेशन कार्डचे वितरण

पळशी व परिसरातील नागरीकांचे विशेषतः आदिवासी बांधवांच्या रेशन कार्डचा प्रश्न गेल्या दिड वर्षांपासून प्रलंबित होता. वारंवार मागणी करूनही रेशनकार्ड मिळत नसल्याने अलिकडेच नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने तहसिल कार्यालयात आंदोलन करण्यात येउन प्रशासनास धारेवर धरण्यात आले होते. या आंदोलनानंतर हा प्रश्न मार्गी लागला असून ज्ञानदेव लंके यांच्या हस्ते वंचित लाभार्थ्यांना रेशन कार्डचे वितरण करण्यात आले.

### खा. लंके यांनी शब्द पुर्ण केला

बाजार समितीच्या निवडणूकीदरम्यान खा. नीलेश लंके यांनी सेवा सोसायटीच्या इमारतीसाठी १५ लाख रूपये निधी देण्याचा शब्द दिला होता. खा. लंके यांनी दिलेला शब्द पुर्ण करून प्रत्यक्ष कामाचे भुमिपुजन झाल्याने पळशी ग्रामस्थांनी खा. लंके यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# शिरापूरच्या कन्येचे नेमबाजीत यश

## प्रतिक्षा वडणे हिची पूर्व राष्ट्रीय नेमबाज स्पर्धेत निवड

चोंभूत : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील शिरापूर येथील प्रतिक्षा सोमनाथ वडणे ह्या कन्येने नाशिक येथे पार पडलेल्या महाराष्ट्र एअर गन कॉम्पिटिशन स्पर्धेत घवघवीत यश मिळवून पूर्व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्रतीक्षा ही शिरूर येथील युनिक शूटिंग स्पोर्ट्स क्लब मध्ये प्रशिक्षक श्री शरद तरटे यांच्या मार्गदर्शनाखाली शूटिंग प्रशिक्षण घेत आहे. याच क्लब मधील एकूण पाच खेळाडूंची निवड पूर्व राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली आहे.**

प्रतिक्षा ही शिरापूर गावची रहिवाशी असून वडील सोमनाथ वडणे हे माजी सैनिक आहे. आई जयश्री वडणे ह्या ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत आहेत. घरातील वडलांच्या सैनिकी शिस्तीतून प्रतिक्षा हिच्यावर संस्कार झाले व वडलांच्या पाठबळातून तिने नेमबाज हे क्षेत्र निवडले. नाशिक येथे संपन्न झालेल्या स्पर्धेत प्रतीक्षाने १० मी. पिप साईड एअर रायफल या प्रकारात ४०० पैकी ३३४ गुणांची मजल मारत तिने अहमदाबाद (गुजरात )येथे होणाऱ्या पूर्व राष्ट्रीय नेमबाज स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले.




### प्रतिक्षा हिने देश पातळीवर ठसा उमटवावा

पारनेर तालुक्यातील मुले वेगवेगळ्या क्षेत्रात नाव लौकिक करत आहे ही अभिमानाची बाब आहे. प्रतीक्षा हिने मिळवलेले यश कौतुकास्पद असून तीच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा देत आहे. तिने तालुक्याचे नाव देशपातळीवर गाजवावे.

**नीलेश लंके,** खासदार

या यशाबद्दल मा. मधुकर उचाळे यांनी कौतुक तर सोसायटीचे व्हा. चेअरमन अंकुश वडणे यांनी सन्मान केला.गावाचे सरपंच, उपसरपंच, सदस्य सोसायटी चेअरमन, व्हा. चेअरमन,संचालक यांनी अभिनंदन केले.

# डी.बी.एम स्कूलमध्ये ईव्हीएमद्वारे स्मार्ट मतदान!

## तंत्रज्ञान आणि पारदर्शकतेचा अनोखा संगम




राळेगणसिद्धी : प्रतिनिधी

**जगभरात ईव्हीएम मशीन प्रणालीवर शंका व्यक्त केली जात असताना, राळेगण सिद्धी येथील डी.बी.एम स्कूलने एक अभिनव पाऊल उचलले. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटचा वापर करून अत्याधुनिक पद्धतीने शालेय मंत्रिमंडळ निवडणूक यशस्वीपणे घेतली, ज्यामुळे ईव्हीएमचा वापर सुरक्षित आणि प्रभावी असल्याचे सिद्ध झाले.**

विद्यालयाचे प्राचार्य जे.डी.मापारी यांनी या उपक्रमाचे उद्घाटन करताना विद्यार्थ्यांना निवडणुकीचे महत्त्व पटवून देत, लोकशाही प्रक्रियेचे महत्व अधोरेखित केले. त्यांनी मतदानाचा हक्क हा प्रत्येक नागरिकाचा अभिमान असल्याचे सांगत, लोकशाही ही केवळ शासन पद्धती नसून एक जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिक बनून देशाच्या भविष्यनिर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा, अशी प्रेरणादायी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या निवडणुकीच्या माध्यमातून शाळा प्रतिनिधी(स्कूल रिप्रेझेन्टॅटिव्ह) तसेच विरोधी पक्ष नेता यांची निवड करण्यात आली. कु.भक्ती जऱ्हाड या विद्यार्थिनीची स्कूल रिप्रेझेन्टॅटिव्ह म्हणून तर सार्थक घावटे या विद्यार्थ्यांची विरोधी पक्ष नेता म्हणून निवड करण्यात आली.ही सर्व निवडणूक प्रक्रिया ई व्ही एम मोबाईल अँपच्या साहाय्याने पार पाडली.

यावेळी निवडणूकीसाठी उभे राहिलेल्या उमेदवारांनी जोरदार घोषणा, बॅनरबाजी व प्रचारही केला. या निवडणूकीमध्ये श्रावणी मापारी,पंकज नवले,साई मापारी, आणि भाग्यश्री शिर्के इत्यादी विद्यार्थी मतदान अधिकारी म्हणून आपापल्या भूमिका पार पाडत होते.यावेळी मतदार यादी म्हणून वर्गनिहाय याद्या केल्या व त्यावर मतदान करणाऱ्या विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेतली. विद्यार्थ्यांच्या बोटास शाई लावण्यात आली.विद्यार्थ्यांना उमेदवारांची नावे आणि चिन्हांची यादी मशीनवर उपलब्ध होती, ज्याच्या पुढे निळे बटण होते. विद्यार्थ्यांनी योग्य उमेदवाराची निवड करताना निळ्या बटणाचा वापर केला. सर्व विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी मतदानाचा हक्क उत्साहात बजावला.ज्यामुळे त्यांना निवडणुकीची प्रक्रिया प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली.

श्री.जाधव सर यांनी निवडणुकीच्या विविध टप्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी ईव्हीएमचे कार्य कसे करायचे, मतदान कसे करायचे, आणि मतमोजणी प्रक्रिया कशी पार पाडायची याबद्दल सविस्तर माहिती दिली.

जे.डी मापारी सर यांनी सर्वांच्या उपस्थितीत निवडणुकीचा निकाल जाहीर केला व सर्व विजयी उमेदवार विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच शितल मापारी मॅडम यांनी सर्व विजयी उमेदवारांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.अशाप्रकारे ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीन चा प्रत्यक्ष वापर करून अत्याधुनिक पद्धतीने शालेय मंत्रिमंडळ निवडणूक घेणाऱ्या डिजिटल डी.बी.एम शाळेचे सर्वत्र पंचक्रोशीत कौतुक होत आहे.

# मुंबई व्यासायिकांचे निघोज परिसर विकासासाठी मोठे योगदान

## वसंत कवाद यांचे प्रतिपादन

निघोज : प्रतिनिधी



**निघोज व परिसरातील विकासासाठी मुंबई येथील व्यावसायीकांचे मोठ्या प्रमाणात योगदान असून निघोज ग्रामस्थ आणी मुंबईकर मंडळ यांचा समन्वय असल्याने निघोज व परिसराचा मोठ्या प्रमाणात विकास झाला असल्याचे प्रतिपादन मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद यांनी व्यक्त केले आहे.**

कुलाबा ( मुंबई ) येथील मच्छी व्यवसायीक व निघोज गावचे लामखडे भावकीतील ज्येष्ट कारभारी शांताराम अनंथा लामखडे यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला पंधरा हजार रुपयांची देणगी दिल्याबद्दल त्यांचा सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदेव लंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कवाद बोलत होते.

लामखडे यांनी बंदर बंद तसेच बंदर सुरू झाल्यानंतर आजपर्यंत प्रत्येक वर्षी सातत्याने आजपर्यंत देणगी दिली असून आजपर्यंत मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला त्यांनी दिड ते दोन लाख रुपयांच्या देणग्या देऊन मोठ्या प्रमाणात आर्थिक योगदान दिले आहे. यावेळी माजी सरपंच व मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त ठकाराम लंके, मुंबई येथील व्यवसायीक मच्छिंद्र लंके, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रमेश ढवळे, बबनराव ससाणे, प्रगतीशील शेतकरी कैलास वरखडे, ट्रस्ट व्यवस्थापक महेश ढवळे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कवाद म्हणाले शांताराम लामखडे यांनी आजपर्यंत मुंबई येथे व्यवसाय करताना प्रत्येक वर्षी देणगीच्या माध्यमातून योगदान दिले आहे. मुंबईकर मंडळ आणि निघोज ग्रामस्थ यांचा चांगला समन्वय असल्याने निघोज परिसरात मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट व विविध संस्था माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास मार्गी लागला असून जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसर तसेच राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा तिर्थक्षेत्र परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे मार्गी लागली आहेत अशाप्रकारे ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांचे सहकार्य मोलाचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त बबनराव ससाणे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी विश्वस्त रमेश ढवळे यांनी आभार मानले.

# रेशनिंगचे धान्य ऑफलाईन देण्याचे शासनाचे निर्देश

## स्वस्त धान्य संघटनेच्या आंदोलनास यश

सुपा : प्रतिनिधी

**राज्यातील स्वस्त धान्य दुकानात सर्व्हर समस्येमुळे येणाऱ्या अडचणी लक्षात घेता केंद्र शासनाने माहे जुलै महिन्याचे धान्य हे ऑफलाइन देण्याची निर्देश मेलद्वारे सर्व पुरवठा विभागांना दिले असल्याची माहिती स्वस्त धान्य संघटनेचे सचिव रमेश गवळी यांनी दिली.**



सरकारमान्य स्वस्त धान्य संघटना महाराष्ट्र राज्याच्या वतीने आझाद मैदानावर क्रांतिकारक दिन सर्व स्वस्त धान्य दुकानाच्या समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्यातून सर्व संघटनेचे पदाधिकारी आणि स्वस्त धान्य दुकानदार यांच्या वतीने आंदोलन छेडण्यात इशारा देण्यात आला होता.या आंदोलनास यश आले असून माहे जुलै महिन्याचे धान्य आता लाभार्थ्यांना उपलब्ध होणार आहे.

राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगनिकरण प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे त्यानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांचे बायोमेट्रिक ओळख पटवून अन्नधान्य वितरण करण्याकरिता स्वस्त धान्य दुकानांमध्ये फोर जी तंत्रज्ञान असलेल्या ई- पॉश मशीन बसवण्यात आले आहेत. राज्यात काही दिवसापासून स्वस्त धान्य दुकानातील ई-पॉस मशीन मधून अन्नधान्य वितरण करताना तांत्रिक अडचणी येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. सदर तांत्रिक समस्येमुळे अन्नधान्य वितरण ऑफलाईन देण्याची विनंती शासनाच्या वतीने क्षेत्रीय कार्यालयांना करण्यात आली आहे.

अपवादात्मक परिस्थितीमध्ये ऑफलाईन धान्यवाटप करण्याकरिता स्वस्त धान्य दुकाननिहाय लॉगिन तयार करण्याच्या सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आल्या असून ज्या स्वस्त धान्य दुकानाचे लॉगिन पोर्टलवर तयार करण्यात आले नसतील अशा स्वस्त धान्य दुकानाचे लॉगिन तात्काळ तयार करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत.

राज्यातील सर्व्हरशी संबंधित तांत्रिक अडचणीचे निराकरण होईपर्यंत एक विशेष बाब म्हणून ऑफलाइन धान्य वितरणास परवानगी देण्यात आली आहे. ऑफलाईन धान्य वितरण करताना शासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत ते वितरण करण्यात यावे व त्याच्या नोंदी प्रमाणित करून वाटप करण्यात आलेल्या अन्नधान्याचा तपशील शासनास सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

# खतांचे येणाऱ्या कोठ्यातून समान वाटप करा

## संचालक अनिकेत शेळके यांची मागणी

सुपा : प्रतिनिधी

**जिल्हा खरेदी विक्री संघाची मासिक सभा खेळीमेळीच्या वातावरणात चेअरमन विलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी खत टंचाईवर अतिशय गांभीर्याने चर्चा होऊन खतांचा विशेतहा युरियाच्या पुरवठ्यावर चर्चा होत असताना येणाऱ्या कोठ्यातून समान वाटप करुन श्रीगोंदा तालुक्याचा भाग स्वतंत्र करून देण्याची मागणी तालुक्याचे संचालक अनिकेत रविंद्र शेळके यांनी आक्रमतेने केली.**



तालुक्यातील ४६ संथा सभासद असून त्यांचे २१,९७२ शेतकरी सभासद आहेत तरी त्यांना आपल्या संघाच्या स्तरावरून नियमित पुरवठा केला जावा आवश्यकता भासल्यास श्रीगोंदा कृषी उत्तप्न बाजार समितीत खताच्या डेपोसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची ग्वाही यावेळी संचालक शेळके यांनी दिली.

यावेळी चेअरमन विलास शिंदे, व्हा. चेअरमन शिवाजी मते, संचालक - राहुल आप्पासाहेब राजळे, सुधीर राळेभात, गणेश शेळके, युवराज तनपुरे, किरण पाटील, दादा साबळे, सचिन लांडगे, अनिकेत शेळके, देवेंद्र बेरड सचिव उपस्थित होते. श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त जिल्हा खरेदी विक्री संघातून खत पुरवठा होण्यासाठी तालुक्यात खत डेपो सुरू करण्यासाठी संचालक अनिकेत शेळके यांनी पुढाकार घेतल्याचे सचिव देवेंद्र बेरड यांनी सांगितले.

# दशक्रिया विधीसाठी स्वखर्चातून साडे पाच लाख रुपयांचे शेड

## सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदेव लंके यांचे कौतुक



निघोज : प्रतिनिधी

**निघोज आणि परिसरातील वाढती लोकसंख्या व दशक्रिया विधी परिसरात बसण्यासाठी ऊन वारा पाऊस याचा त्रास आलेल्या ग्रामस्थांना होऊ नये यासाठी मुंबई येथील व्यवसायीक व निघोज परिसरातील सामाजिक कार्यकर्ते तसेच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके यांनी त्यांच्या मातोश्री कै. उल्हासबाई नामदेव लंके व मामा कै. देवराम बाळा लामखडे यांच्या स्मरणार्थ निघोज येथील दशक्रिया विधी घाट परिसरासाठी साडे पाच लाख रुपये स्वस्त. खर्च करुण सुसज्ज शेड बांधले असून त्याचे लोकार्पण नुकतेच आजी माजी सरपंच, उपसरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ तसेच आप्तेष्ट नातेवाईक व मित्र परिवार यांच्या उपस्थितीत करण्यात आले.**

निघोज गावची लोकसंख्या पंचवीस हजाराच्या आसपास असून या ठिकाणी नियमितपणे दशक्रिया विधी घाट येथे दशक्रिया विधी होत असतात. हा परिसर कपिलेश्वर मंदीर जवळ तसेच पुष्पावती नदीकिनारी हा परिसर असल्याने सकाळी आठ ते साधारण साडे नऊ वाजेपर्यंत दशक्रिया विधी कार्यक्रम सुरू असतो. कधी कधी प्रवचनकार जास्त वेळ ज्ञानदानाचे काम करतात तसेच श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी नेतेमंडळी व मान्यवर यांची गर्दी मोठ्या प्रमाणात असल्याने साधारण सकाळी साडे सात ते साडेनऊ वाजेपर्यंत दशक्रिया विधी कार्यक्रम सुरू असतो मात्र हा परिसर आजपर्यंत खूल्या जागेवर असल्याने ऊन वारा पाऊस याचा त्रास सातत्याने उपस्थित लोकांना होत असतो.

यासाठी मुंबई येथील व्यवसायीक व सामाजिक कार्यकर्ते व मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके यांनी याठिकाणी मातोश्री व मामा यांच्या स्मरणार्थ साडेपाच लाख रुपये स्वतः खर्च करून शेड उभे केले असून आलेल्या हजारो लोकांना बसण्यासाठी सुसज्ज जागा उपलब्ध झाली आहे. लंके यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. लंके यांनी आजपर्यंत स्वतः देणगी देऊन अनेक सामाजिक व धार्मिक कामे केले असून मुंबईकर मंडळ यांच्या माध्यमातून त्यांनी निघोज येथील बाजारतळावर यात्रेकरूंसाठी एक सुसज्ज पत्रा शेड उभे केले असून मे महिन्यात झालेल्या देवीच्या यात्रेसाठी आलेल्या बाहेरगावी भावीकांनी या शेडचा उपयोग देवीचे धार्मिक कार्यक्रम व सवाष्णी साठी करुण घेतला असून मुंबईकर मंडळांनी उभे केलेल्या या शेडबद्दल कौतुक केले आहे.

# पाच कोटींची ऑफर देणाराला अटक करा

## ■ मनसे नेते अविनाश पवार यांची मागणी ■ पोलीस अधीक्षकांना निवेदन

सुपा : प्रतिनिधी

**नगर पोलीस दलातील स्थानिक गुन्हे शाखेतील हप्तेखोरी विरोधात खा. नीलेश लंके यांनी आंदोलन करून नये यासाठी पाच कोटींची ऑफर देणा-याची चौकशी करून त्यास अटक करण्याची मागणी मनसे नेते अविनाश पवार यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेउन त्यांना निवेदन सादर केले. संबंधित व्यक्तीवर आठ दिवसांत कारवाई न झाल्यास पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशाराही पवार यांनी दिला आहे.**

पवार यांनी म्हटले आहे की, खा. नीलेश लंके यांनी पोलीस दलातील हप्तेखारीचे अनेक प्रकार पुराव्यांसह उघड केल्याने नगरसह महाराष्ट्र पोलीसांची बदनामी झाली आहे. चांगल्या पध्दतीने काम करणा-या अधिकारी तसेच कर्मचारी यांचेही त्यामुळे मानसिक खच्चीकरण झाले आहे. पोलीस प्रशासनाबाबत संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. या गोष्टीची पोलीस प्रशासनाने गांभीर्याने विचार करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी करतानाच मागणीची तड न लागल्यास पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.



यावेळी मनसेच्या सहकार सेनेचे जिल्हाध्यक्ष नितिन म्हस्के, जिल्हा उपाध्यक्ष मारूती रोहोकले, पारनेर तालुका उपाध्यक्ष सतीश म्हस्के, सुपा शहराध्यक्ष अक्षय सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com